# नियमित दिवाणी दावा क्र.३८/२०१४ (सुनिता अरविंद पालके विरुध्द तुकाराम बाबु ओहाळ व इतर) मधील नि.क्र.२५ येथील अर्जावरील आदेश.

प्रस्तुत अर्ज व अर्जावरील वादीचे म्हणणे वाचले. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३, ६ व ७ यांचे सन्माननीय विधिज्ञांचे युक्तिवाद ऐकले.

प्रतिवादी क्र. १ ते ३, ६ व ७ यांनी त्यांचेविरुध्द नि.क्र.१ येथे दिनांक २४/०९/२०१४ रोजी पारीत झालेला विना लेखी कैफियत आदेश रद्द करुन त्यांची लेखी कैफियत दाखल करणेकामी परवानगी देणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दिला आहे.

वादीने म्हणण्यामध्ये असे नमूद केले की, सदर प्रकरणात प्रतिवादींनी मुदतीत लेखी कैफीयत व म्हणणे दाखल केलेले नाही, तसेच प्रतिवादी यांनी ९० दिवसात लेखी कैफीयत दाखल केलेली नसल्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा आणि वैकल्पिकरित्या अर्ज मंजूर केल्यास सदर प्रतिवादींनी वादीस जास्तीत जास्त खर्च देणेबाबत आदेश करावा.

अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदर प्रतिवादी यानी दाव्यात हजर झाल्यानंतर लेखी कैफीयत सादर न केल्याने त्यांचेविरुध्द दिनांक २४/०९/२०१४ रोजी विना लेखी कैफियत आदेश नि.क्र.१ येथे पारीत करण्यात आला. सदर प्रतिवादींनी दिनांक २४/०९/२०१४ रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. अर्जातील कथनांच्या पृष्टयर्थ दाखल केलेल्या नि.क्र.२६ येथील शपथपत्रामध्ये प्रतिवादी क्र.१ यानी असे नमूद केले आहे की, महत्वाची कागदपत्रे न मिळाल्यामुळे त्याना मुदतीत लेखी कैफियत देणेस विलंब झाला आहे व त्यामुळे त्यांची लेखी कैफियत दाखल करुन घेण्यात यावे. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादीने प्रतिवादींविरुध्द वाटपाचा प्रस्तुत दावा दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जातील कथनांचे पृष्ठयर्थ प्रतिवादी क्र. १ यांनी नि.क्र.२६ येथे त्यांचे शपथपत्र सादर करुन लेखी कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत कारणे नमूद केली आहेत. उभयपक्षांमधील वाद गुणदोषावर पूर्णपणे निकाली काढण्यासाठी न्यायाच्या दृष्टीने झालेल्या विलंबाबाबत वादीना खर्च देण्याच्या अटीवर सदर प्रतिवादी क्र.१ ते ३, ६ व ७ यांना लेखी

कैफीयत दाखल करण्यास परवानगी देणे न्यायोचित ठरेल. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार नाही. याउलट प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादी क्र. १ ते ३, ६ व ७ यांचे कधीही भरुन न येणारे नुकसान होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीमध्ये सर्व बाबींचे अवलोकन करता प्रतिवादी क्र. १ ते ३, ६ व ७ यांनी वादीला एकूण २५०/— रुपये खर्च देण्याच्या अटीवर प्रस्तुत अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त ठरेल.

परिणामत: उपरोक्त विश्लेषणाचे अवलोकन करुन मी निम्नलिखित आदेश पारीत करीत आहे.

---

# आ दे श

---

१) प्रस्तुतचा अर्ज खालील प्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र. १ ते ३, ६ व ७ यांनी वादीला एकूण २५०/— रुपये खर्च पुढील तारखेपर्यंत न चुकता देण्याच्या अटीवर त्यांचेविरुध्द नि.क्र.१ येथे दिनांक २४/०९/२०१४ रोजी पारीत केलेला विना लेखी कैफियत आदेश रद्द करुन त्यांची लेखी कैफीयत दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

३) प्रस्तुतच्या आदेशाचे निवेदन खुल्या न्यायासनासमोर घोषित करण्यात आले.

सही/—

दिनांक :—०४/०७/२०१६
परंडा.

**(सचिन स.पाटील)**
**सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर,परंडा**